# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र. :- कबोचौउमवि/१६/बातमी-सीटीपीसी/हस्तदेय/२०२२ दिनांक : ६ जुलै,२०२२

जळगाव दि.६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाअंतर्गत केमिकल टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थ्यांसाठी चार कंपन्यांकरीता झालेल्या ऑनलाईन मुलाखतीत चार विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे.

युनिर्व्हसिटी इन्स्टिटयूट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी येथील विद्यार्थ्यासाठी जेएसडब्ल्यु पेंट, कामधेनु कंपनी आणि अदानी विलमर या नामांकित कंपनी तर्फे मुलाखती आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यामधून बी.टेक.पेंटस आणि ऑईल टेक्नॉलॉजीच्या साक्षी पाटील, दिशिकेश जाधव, प्रणय काथवटे यांची यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याशिवाय स्टार आय.टी. टेक्नॉलॉजी, मुंबई या कंपनीतर्फे झालेल्या मुलाखतीत एम.एस्सी.संख्याशास्त्रचा तेजच जाधव या विद्यार्थ्यांची निवड झाली. यासाठी केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा, प्रा.रवींद्र पुरी व समन्वयक प्रा.रमेश सरदार यांनी व्यवस्थापन केले. मा.कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, प्रभारी कुलसचिव प्रा.किशोर फ.पवार, डॉ.उज्वल पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**बातमी क्र.०२**

जळगाव दि.६ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस् येथे विद्यापीठाचे कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते आज बुधवार दि.६ जुलै रोजी वृक्षारोपण करुन मियावाकी पध्दतीचा लहान वन प्रकल्प उभारणीस सुरुवात करण्यात आली.

यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, प्रभारी कुलसचिव प्रा. किशोर पवार,विभागप्रमुख डॉ.आर.एस.बेंद्रे, डॉ.विकास गीते यांच्या हस्ते देखील वृक्षारोपण करण्यात आले. स्कूल ऑफ केमिकल सायन्सेस प्रशाळेच्या इमारती जवळील खुल्या जागेत २०X२० फुट या चौरस जागेत हा वन प्रकल्प उभा करण्यात येत आहे. प्रशाळेतील विद्यार्थ्यांकडून व शिक्षकाकडून विविध वृक्षांची १५० रोपे लावण्यात येणार आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरुकता निर्माण होण्यास मदत होईल. हा वन प्रकल्प यशस्वी करण्यासाठी प्रशाळेचे संचालक प्रा.डी.एच.मोरे, शिक्षक, शिक्षकेत्त्र कर्मचारी, उद्यान विभागातील कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

---

प्रति,

मा. संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त् बातमी आपल्या जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयाच्या दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी